क्रमांक : १३५९५ /क-४
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई/नागपूर,
दिनांक : २९ जून, २०२२.

**:: ज्ञापन ::**

**- प्रस्तावना -**

शासनाचे मा. मंत्री तसेच, विविध पदाधिकारी/अधिकारी यांना त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहन खरेदीकरीता असलेली किंमत मर्यादा ठरविण्याबाबतचे धोरण शासन निर्णय क्रमांक : वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दिनांकीत २८ जुलै, २०२० मध्ये विहीत करण्यात आले आहे. तथापि, सदर धोरण हे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास लागू नाही. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १८७ द्वारा राज्य विधानमंडळांना असलेल्या घटनादत्त स्वायत्ततेनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयासाठी वाहन खरेदी व देखभाल दुरुस्ती संबंधी स्वतंत्र धोरण ठरविण्याचे मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा.मंडळाच्या विचाराधीन होते. त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, उप पीठासीन अधिकारी, विरोधी पक्ष नेते व अन्य पदाधिकारी/अधिकारी यांच्या वापरासाठी मा.मंडळाने खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे:-

**"वाहन खरेदी व देखभाल दुरुस्ती धोरण"**

१. नवीन वाहन/निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदी करताना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खरेदी करण्यात यावे असा मा.मंडळाने निर्णय घेतला आहे:-

| अ.क्र. | मा.पीठासीन अधिकारी, उप पीठासीन अधिकारी/ विरोधी पक्ष नेते/प्रधान सचिव व पदाधिकारी/अधिकारी यांची पदनामे | अनुज्ञय वाहने | वाहनांचा प्रकार | किंमत मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद | १) त्यांच्या वापरासाठी एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन | वाहन खरेदीस किंमत मर्यादा नाही, |
| | | २) त्यांच्या कार्यालयीन वापरासाठी एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये पस्तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्परी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू. ३५ लाखाच्या मर्यादेत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा | १) त्यांच्या वापरासाठी एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन | वाहन खरेदीस किंमत मर्यादा नाही, |
| | | २) त्यांच्या कार्यालयीन वापरासाठी एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये पस्तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.३५ लाखांच्या मर्यादेत. |
| ३. | मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.३० लाखांच्या मर्यादेत. |
| ४. | मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.३० लाखांच्या मर्यादेत. |
| ५. | मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.३० लाखांच्या मर्यादेत. |
| ६. | मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक पारंपारिक इंधन वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये तीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.३० लाखांच्या मर्यादेत. |
| ७. | प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे | रुपये वीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.२० लाखांच्या मर्यादेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | |
| ८. | सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये वीस लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.२० लाखांच्या मर्यादेत. |
| ९. | मा. सभापतींचे सचिव | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये पंधरा लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्परारी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.१५ लाखांच्या मर्यादेत. |
| १०. | मा. अध्यक्षांचे सचिव | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये पंधरा लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्परारी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.१५ लाखांच्या मर्यादेत. |
| ११. | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या वापरासाठी वाहन | एक वाहन | त्यांच्या पसंतीनुसार एक विद्युत वाहन. तथापि, स्तंभ ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत | रुपये पंधरा लाख (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेंम्परारी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य इत्यादी अंतर्भूत करून) एकूण रू.१५ लाखांच्या मर्यादेत. |

२. विद्युत वाहन शासकीय उपक्रम अथवा उत्पादक संस्थांचे अधिकृत विक्री केंद्र यांचे मार्फत वेळेत उपलब्ध होऊ शकत नसल्यास, यथास्थिती, मा.मंडळाच्या/प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या मान्यतेने अत्यावश्यक बाब म्हणून पारंपरिक इंधन वाहन खरेदी करता येईल.

३. प्रधान सचिव तसेच सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना अनुज्ञेय वाहनांचा दर्जा वेळोवेळी मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा. मंडळाच्या मान्यतेने निश्चित करण्यात येईल.

४. मा. सभापतींचे सचिव तसेच मा. अध्यक्षांचे सचिव यांच्या वापरासाठी तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या कार्यालयीन वापरासाठी अनुज्ञेय वाहनांचा दर्जा प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे निश्चित करतील.

५. वाहनांच्या वापराबाबत पुढीलप्रमाणे किमान कालमर्यादा व धावमर्यादा निश्चित करण्यात येत आहे :-

अ) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तसेच मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे वाहन प्रत्येकी पाच वर्षाचा कालावधी अथवा एकूण २,४०,००० किलोमिटर्सची धाव मर्यादा यापैकी जे अगोदर होईल तेव्हा वाहन बदलण्याची मुभा असेल.

ब) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तसेच, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या वाहनाचा प्रत्येकी सात वर्षाचा कालावधी अथवा एकूण २,४०,००० किलोमिटर्सची धाव मर्यादा यापैकी जे अगोदर होईल तेव्हा वाहन बदलण्याची मुभा असेल.

क) मा.सभापतींचे सचिव, मा.अध्यक्षांचे सचिव तसेच, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या वापरासाठी असलेल्या वाहनांच्या प्रत्येकी दहा वर्षाच्या कालावधी अथवा एकूण २,४०,००० किलोमिटर्सची धाव मर्यादा यापैकी जे अगोदर होईल तेव्हा वाहन बदलण्याची मुभा असेल.

६. यानुसार वाहन बदलून त्याऐवजी नवीन वाहन खरेदी करण्याबाबत नमूद केलेली उपरोक्त किमान कालमर्यादा अथवा धाव मर्यादा यापैकी जे अगोदर होईल ते पूर्ण झाल्यावर उक्त वाहन निर्लेखनाच्या अधिन राहून नवीन वाहन खरेदी अनुज्ञेय राहील.

७. जर वाहनाचा अपघात किंवा मोठ्या प्रमाणावरील बिघाड झाल्यास त्या वाहनाबाबत शासकीय परिवहन सेवा यांचेकडून अहवाल मागविण्यात यावा. अशा अहवालात संबंधित "वाहन दुरूस्त करून पुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्टया किफायतशीर राहणार नाही" अशी शिफारस करण्यात आल्यास ती विचारात घेऊन वाहन निरुपयोगी ठरविण्यात यावे व त्यानुसार निर्लेखनाच्या अधिन राहून नवीन वाहन अनुज्ञेय राहील. अशा प्रकारे वाहनांच्या निर्लेखनासाठी विहीत कालमर्यादा अथवा धाव मर्यादा (किलोमिटर्समध्ये) याबाबतची कोणतीही 'अट' लागू असणार नाही.

८. खरेदी करण्यात आलेल्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत त्या-त्या वाहन उत्पादक कंपनीच्या अधिकृत सेवा केंद्र ( Authorised service center ) अथवा त्या वाहनातील तज्ज्ञ / अनुभवी अशा सेवा केंद्रांमधून शक्यतो किमान तीन वर्ष मुदतीचा करार करुन नियमित स्वरुपात आवश्यक सुट्टया भागांसह देखभाल दुरुस्ती करण्यात यावी. आवश्यकतेनुसार अशा करारास वेळोवेळी प्रधान सचिवांच्या मान्यतेने मुदतवाढ देता येईल. अथवा आवश्यक झाल्यास शासकीय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांचेकडून देखील त्यांचे शिफारशीनुसार सदर देखभाल दुरुस्ती करण्यात यावी.

९. नवीन वाहन खरेदी करताना जुन्या मुदतबाह्य झालेल्या वाहनाचे शासकीय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांचेकडून त्यासंदर्भातील प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वाहन निर्लेखन करणे बंधनकारक राहील.

१०. निर्लेखित वाहन जाहिर लिलाव प्रक्रियेने तीन महिन्यांच्या आत निकाली काढण्यात यावे.

११. याप्रमाणे वाहन धोरण निश्चित केल्यानुसार शासकीय विभागांकरिता वाहन खरेदीबाबत किंवा वाहन निर्लेखनाबाबत काढलेले शासन आदेश,अटी व नियम महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास लागू असणार नाहीत व मा. मंडळाने वाहन खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता दिल्यानंतर सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठवण्याची आवश्यकता असणार नाही.

१२. सर्व वाहनांचा शासकीय विमा उतरवणे बंधनकारक राहील.

१३. प्रस्तावित पारंपारिक इंधन वाहने/ विद्युत वाहने खरेदी करून अथवा भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव हा प्रधान सचिव / सचिव यांच्या मान्यतेने करण्यात येईल. या सचिवालयातील पदाधिकारी/ अधिकारी यांचेसंदर्भात वाहन अनुज्ञेयतेबाबत निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समवेश असलेल्या मा.मंडळाचे असतील.

१४. वाहनांच्या किंमत मर्यादेबाबत कालानुरूप आवश्यक वाढ करणे / काही बदल करण्याचा अंतिम अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा. मंडळाचा असेल.

१५. या ज्ञापनात नमूद केल्याप्रमाणे वाहनांच्या खरेदीकरीता करण्यात येणारा खर्च या सचिवालयाच्या त्यासंबंधिच्या मंजूर अनुदानामधून भागविण्यात यावा.

१६. सदर वाहन धोरणान्वये केलेल्या तरतूदी या ज्ञापनाच्या निर्गमनाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( राजेन्द्र भागवत )
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
४) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे सचिव.
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
६) मा. विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
७) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
८) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
९) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, वित्त विभाग ( विनियम ), मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे), मंत्रालय, मुंबई.
१४) उप सचिव व त्यावरील सर्व अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
१६) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१७) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१९) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई.
२०) कक्ष क-१ आस्थापना
२१) निवडसूची
२२) क-२ (संगणक कक्ष)